# 'पुणे कनेक्ट'चे 'एकमेकां साह्य करू'

## स्टार्टअप सॉफ्टवेअर कंपन्यांना देणार मदतीचा हात

**पुणे, ता. २ :** नव्याने सुरू होणाऱ्या सॉफ्टवेअर कंपन्यांना त्यांच्या सुरवातीच्या काळात उद्भवणाऱ्या समस्यांमधून मार्ग काढण्यासाठी आवश्यक असलेले साह्य आणि मार्गदर्शन उपलब्ध व्हावे यासाठी सॉफ्टवेअर एक्स्पोर्टस असोसिएशन ऑफ पुणे (सीप) पुढाकार घेत असून, 'पुणे कनेक्ट २०११' या खास उपक्रमाद्वारे १२ कंपन्यांना मदतीचा हात देणार आहे. या उपक्रमासाठी 'सीप'ला 'द इंडस आंत्रप्रेनर्स' (टाय), पुणे ओपन कॉफी क्लब आणि पुणे टेकचे सहकार्य लाभले आहे.

यासंदर्भात सीप, पुणेचे अध्यक्ष गौरव मेहरा यांनी सांगितले, की होतकरू उद्योजकांना उत्तेजन देणारी आणि नव्याने सुरू होणाऱ्या व्यवसायांना आधार देणारी व्यवस्था पुण्यात विकसित करावी, ही पुणे 'पुणे कनेक्ट २०११' चे आयोजन करण्यामागची मूळ कल्पना आहे. नव्या कंपन्या आणि सुस्थापित कंपन्या यांच्यात संवाद व्हावा आणि त्यातून नवीन कंपन्यांना सुरवातीचे ग्राहक मिळण्याच्या टप्प्यापर्यंत मदत करणारे मार्गदर्शन लाभावे, असा आमचा प्रयत्न आहे.

नव्या आणि अनुभवी उद्योजकांचे एक संमेलन येत्या पाच नोव्हेंबर रोजी मराठा चेंबरच्या मूळगावकर सभागृहात होईल आणि तेव्हा १२ निवडक नव्या कंपन्या आपले उत्पादन किंवा सेवा यांची माहिती उपस्थितांसमोर सादर करतील. यामध्ये सकाळचे सत्र फक्त 'सीप' आणि 'टाय' यांच्या सभासदांकरिता असेल, तर दुपारनंतर हा उपक्रम सर्वांकरिता खुला असेल. डिसेंबर २०११ मध्ये झिनोव्ह कन्सल्टिंगतर्फे आयोजित होणाऱ्या 'अॅडव्हान्टेज पुणे' या कार्यक्रमातही कंपन्यांना सादरीकरण करता येईल.

'सीप'तर्फे या उपक्रमाचे नेतृत्व सुहास केळकर, मोती थडानी आणि गौरव मेहरा करीत आहेत, तर 'टाय'तर्फे विश्वास महाजन यात सहभागी आहेत. पुणे कनेक्ट २०११ मध्ये सहभागी होणाऱ्या १२ कंपन्यांची निवड पुणे टेकचे अमित परांजपे आणि नवीन काब्रा तसेच पुणे ओपन कॉफी क्लबचे संतोष दावरा आणि डॉ. सारंग लकारे यांनी केली आहे.